ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 5

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २४ फेब्रुवारी, १९६० | अंक ८

## विविध माहिती

**मुंबई ते लंडन विमानप्रवास**—मुंबई ते लंडन ह्या प्रवासासाठी एअर इंडिआ इंटरनॅशनल वाहतूक कंपनी लवकरच बोईंग ७०७ हें विमान वापरूं लागणार आहे. ह्या विमानानें हा प्रवास न थांबतां ८॥ तासांत पुरा होईल. ४,००० मैलांचा हा प्रवास करण्यास दुसऱ्या महायुद्धापूर्वी कंपनीचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांना ८ दिवस लागले होते.

**वाघाच्या बच्च्याची भेट**—रशिआचे मुख्य प्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांच्या भारतभेटींत त्यांना खैरागडच्या राणीसाहेबांनीं एक वाघाचा बच्चा भेट म्हणून दिला. वाघाच्या बच्च्याचें नांव " हिरा " असें ठेवण्यांत आलें आहे. कारण तो पन्ना येथील हिऱ्याच्या खाणीजवळ जंगलांत सांपडला आहे.

**कृत्रिम सरोवराची निर्मिति**—रशिआ आणि चीन ह्यांच्या सरहद्दीवर अलटाय पर्वतांत एक मोठें कृत्रिम सरोवर निर्माण करण्यांत येणार आहे. सैबेरिआंतील एका मोठ्या नदीवर वीज निर्माण करण्यासाठी धरण बांधण्यांत येत असल्यामुळें ३८० मैल लांबीचें हें सरोवर आपोआपच तयार होईल. चीन व रशिआ ह्यांच्यांत मालाची वहातूक करण्यासहि त्याचा उपयोग होईल.

**म्हैसूर राज्यांतील साखरेचे कारखाने**—म्हैसूर राज्यांत सध्यां साखरेचे ७ कारखाने आहेत. परंतु त्यांचें उत्पादन राज्याच्या गरजा भागविण्यास अपुरें पडत आहे. आतां आणखी ६ साखरेचे कारखाने काढण्यासाठी जागा निश्चित करण्यांत आल्या आहेत. नवीन कारखाने बहुधा सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येतील.

**उसाच्या चिपाडांपासून कागद**—उसाच्या चिपाडांपासून कागद निर्माण करण्याबाबत मध्यवर्ती सरकारनें जर्मन तंत्रज्ञांकडून अहवाल मागविला होता. जर्मनींत निघालेल्या नव्या उत्पादनपद्धतीमुळें असा कागद तयार करण्यांत यश येईल असें जर्मन तंत्रज्ञांचें म्हणणें आहे. आतां १०० टन उसाचीं चिपाडें प्रयोगासाठी जर्मनींत पाठविण्यांत येणार आहेत.

**टेलको एंजिनांची किंमत**—टेलको कंपनीनें रेल्वेला एप्रिल, १९५८ पासून मार्च, १९६० पर्यंत पुरवावयाच्या रेल्वे-एंजिनांची किंमत ठरविण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें लवाद नेमला होता. लवादानें कंपनी मागत असलेल्या किंमतीपेक्षा प्रत्येक एंजिनाची किंमत १२,००० रुपयांनीं कमी ठरविली आहे. त्यामुळें रेल्वेची २४ लाख रुपयांची बचत होईल. ह्या काळांत कंपनी २५० एंजिनें पुरविणार आहे.

**काजूच्या निर्यातीचे प्रयत्न**—भारतामधील काजूबियांना जपानमध्यें बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न करण्यासाठी तीन जणांचें एक मंडळ टोकिओला जाणार आहे. जपान भारताकडून काजूचें तेल घेत असतो. पण अलीकडे काजुबियांनाहि मागणी येऊं लागली आहे.

**मद्रासच्या बुटांना मागणी**—मद्रासमध्यें तयार करण्यांत येणाऱ्या बुटांना पूर्व जर्मनींत चांगली मागणी येत आहे. पूर्वजर्मन सरकारकडून ११,००० बूटजोडांची मागणी करण्यांत आली असून ती पुरविण्यासाठी सरकारच्या आश्रयाखालील कारखाने व कांहीं खाजगी मालकीचे कारखाने काम करीत आहेत. मद्रासमध्यें तयार झालेल्या बूटजोडांवर ग्राहक खुष आहेत.

**साखरेच्या खपाचें प्रमाण**—साखरधंद्याच्या विकास-समितीची १० वी बैठक दिल्ली येथें भरली होती. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत देशांतील साखरेच्या खपाचा आंकडा ३० लाख टनापर्यंत जावा असें उद्दिष्ट बैठकींत ठरविण्यांत आलें. उद्दिष्ट गांठण्यांत आलें तर सध्यांच्या दरमाणशीं ११·७० पौंड खपाऐवजीं साखरेचा खप १३·८७ पौंड होईल.

**आंध्रमधील आत्मघात**—आंध्र राज्यांत १९५९ च्या पहिल्या नऊ महिन्यांच्या काळांत १,६६३ लोकांनीं आत्महत्त्या केली. त्यांपैकी ९४४ स्त्रिया होत्या व बाकीचे पुरुष होते. आत्मघाताच्या कारणांची माहिती जमविण्यांत आलेली नाहीं. मुंबई राज्यांत गुजरातेंत स्त्रियांच्या आत्महत्त्येचे प्रकार अधिक होतात हें सुप्रसिद्धच आहे.

**कागदाच्या कारखान्याची वाढ**—राजमहेंद्री येथील सरकारी मालकीच्या कारखान्याची उत्पादनक्षमता वाढविण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. सध्यां ह्या कारखान्यांत रोज १० टन कागद तयार होतो. कारखान्याची वाढ करण्यांत आल्यावर रोज ५० टन कागद तयार होऊं लागेल. १९६१ मध्यें कारखान्याच्या विस्ताराची योजना पार पाडण्यांत येईल.

**सौंदर्यप्रसाधनांचा वापर**—भारतांत दरसाल ४ कोटी रुपयांचीं सौंदर्यप्रसाधनें वापरलीं जातात असा अंदाज करण्यांत आला आहे. सर्वांत अधिक वापर पंजाबांत केला जातो. त्याच्या खालोखाल उत्तर प्रदेशाचा व त्यानंतर पश्चिम बंगालचा नंबर लागतो. अलीकडे ह्या बाबतींतील सर्व गरजा भारतांतील कारखाने भागवितात.

## भारताला पोलंडकडून मिळालेलें कर्ज

भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जीं मोठीं विकासाचीं कामें हातीं घेण्यांत येणार आहेत, तीं पार पाडण्यासाठी मदत व्हावी म्हणून पोलंडनें भारताला १५ कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारत पोलंडकडून भांडवली स्वरूपाचा माल आणणार आहे. कर्जाच्या अटी ठरविण्यासाठी पोलंडच्या सरकारचें एक प्रतिनिधिमंडळ एप्रिल महिन्यांत भारतांत येणार आहे. कर्ज बहुधा ८ वर्षे मुदतीचें असेल आणि त्यावर घेण्यांत येणाऱ्या व्याजाचा दरहि बेताचा असेल. कर्जाची फेड भारताकडून माल घेऊन करण्यांत येण्याचा संभव आहे. कर्जफेडीपोटीं पोलंड भारताकडून लोहमिश्रित माती, मँगेनीझची माती, अभ्रक, इत्यादि माल घेईल. कर्जाच्या ह्या व्यवहाराशिवाय पोलंड व भारत ह्यांचा व्यापार वाढविण्यासाठी इतरहि मार्ग शोधले जात आहेत. पोलंड व भारत ह्यांच्या दरम्यान तीन वर्षे मुदतीचा एक व्यापारी करार करण्यांत आला असून तो १९६० जानेवारीपासून अंमलांत आला आहे. पहिल्याच महिन्यांत उभयतां देशांमधील व्यापारांत वृद्धि झालेली आढळून आली आहे. हा व्यापारी करार व भारताला मिळणारें १५ कोटी रुपयांचें कर्ज ह्यांच्या साह्यानें भारत–पोलंड व्यापारांत आणखी वाढ होत जाईल असें मानण्यास हरकत नाहीं. पोलंडमध्यें पोझनान येथें येत्या जून महिन्यांत एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनाला भेट देण्याचें आमंत्रण पोलंडनें दिलेलें आहे. पोलंड भारताला कोणत्या प्रकारचा भांडवली माल देऊं शकेल त्याची कल्पना भारताच्या प्रतिनिधींना ह्या प्रदर्शनावरूनच येईल.

---

## चेकनें वेतन

लवकरच अंमलांत यावयाच्या एका कायद्याप्रमाणें, ग्रेट ब्रिटनमधील कामगार मालकवर्गाला अर्ज करून आपलें वेतन चेकनें मागूं शकतील किंवा बँक खात्यांत भरण्यास सांगूं शकतील. पण, मालकवर्गाला मात्र ह्या पद्धतीनेंच वेतन देण्याच्या अटीवर कामगारांची नेमणूक करतां येणार नाहीं. पेमेंट ऑफ वेजेस बिलांत वरीलप्रमाणें तरतूद करण्यांत आली असून तें कॉमन्स सभेमध्यें जूनच्या सुमारास चर्चिलें जाईल.





अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



# अर्थ

बुधवार, ता. २४ फेब्रुवारी, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रेल्वे खात्याचा १९६०–६१ चा अर्थसंकल्प

रेल्वेमंत्री श्री. जगजीवनराम यांनीं दि. १४ रोजीं संसदेंस रेल्वे खात्याचा १९६०–६१ चा अर्थसंकल्प सादर केला. पे कमिशनच्या शिफारशींमुळें व्हावयाचा जादा खर्च वजा जातां वाहतुकीच्या चालू भाड्यानुसार आगामी वर्षांत रेल्वेच्या जमा-खर्चांत सुमारें ४·५ कोटी रु. महसुली शिल्लक राहील, असें या प्रसंगीं केलेल्या भाषणांत त्यांनीं सांगितलें.

चालू वर्षाची शिल्लक १४·७५ कोटी रुपये राहील असा आतांचा ( दुरुस्त ) अंदाज आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्प सादर करतांना हा आंकडा २१·१९ कोटी रुपये धरलेला होता. या अर्थसंकल्पीय वर्षांत पे कमिशनच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याकरितां १–७–१९५९ ते ३१–३–१९६१ या कालावधी-साठीं सुमारें २० कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली आहे, असें सांगून रेल्वेवरील वाढत्या जबाबदाऱ्यांमुळें मालवाहतुकीच्या भाड्यांत आवश्यक ते फेरफार करणें अटळ होत आहे असें ते म्हणाले.

या वर्षीच्या १ एप्रिलपासून अशुद्ध धातूंची निर्यात तसेंच, लष्कराची, टपालाची व रेल्वेची स्वतांसाठी होणारी वाहतूक वगळतां सर्व मालवाहतुकीवर व दगडी कोळशाच्या वाहतुकीवर रुपयामागें ५ नये पैसे असा पुरवणी आकार द्यावा लागेल असें त्यांनीं जाहीर केलें. या आकारणीपासून दरवर्षी सुमारें १४ कोटी रु. उत्पन्न होईल. रेल्वे स्ट्रक्चर इंक्वायरी कमिटीनें वाहतुकीच्या एकूण दरांवर सुमारें १३ टक्के वाढ करण्याची शिफारस केली असतांहि १ ऑक्टोबर, १९५८ पासून या दरांत फक्त ४ टक्केच वाढ करण्यांत आली आहे याची त्यांनीं आठवण करून दिली.

१९६०–६१ च्या अर्थसंकल्पांत उतारू–वाहतुकीपासून १२५·५० कोटी रु. उत्पन्न होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. हा आंकडा चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजापेक्षा १·४२ कोटी रु. नीं जास्त आहे. त्याचप्रमाणें मालवाहतूक भाड्याच्या चालू दरांनीं येत्या वर्षांत मालवाहतुकीपासून सुमारें २९१ कोटी रु. उत्पन्न होण्याचा अंदाज आहे, हा आंकडा चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजापेक्षा २७ कोटी रु. नीं जास्त आहे. चालू दरानुसार एकूण वाहतुकीपासून १९६०–६१ मध्यें ४५०·५० कोटी रु. उत्पन्न अपेक्षित आहे तर संकल्पित वाढीव दरांमुळें तें ४६४·५० कोटी रु. होईल असा अंदाज आहे.

आगामी वर्षांत रेल्वेच्या नेहमींच्या कामकाजावर ३२६·९० कोटी रु. खर्च होतील असा अर्थसंकल्पीय अंदाज आहे. हा आंकडा चालू वर्षातील अशा खर्चापेक्षा ३४·९८ कोटी रु. नीं अधिक आहे. या रकमेंत पे कमिशनच्या शिफारशींची अंमल-बजावणी करण्यासाठीं १ जुलै, १९५९ ते ३१ मार्च, १९६१ या कालावधीकरितां व्हावयाचा २०·१२ कोटी रु. आणि रेल्वे फ्रेट स्ट्रक्चर इन्क्वायरी कमिटीच्या शिफारशीनुसार रेल्वेनीं 'वाहतुकदार' म्हणून जबाबदारी स्वीकारल्यामुळें सुरुवातीला येणारा १ कोटी रु. खर्च समाविष्ट आहे, असें त्यांनीं सांगितलें.

## १९६०–६१ चें रेल्वे बजेट

( आंकडे कोटी रुपयांत )

| | प्रत्यक्ष | दुरुस्त अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| | १९५८-५९ | १९५९-६० | १९६०-६१ |
| वाहतुकीचें एकूण उत्पन्न | ३९०·२१ | ४२२·०३ | ४६४·५० |
| सर्वसाधारण चालू खर्च | २७६·३३ | २९१·९२ | ३२६·९०* |
| निव्वळ किरकोळ खर्च | ९·४५ | १५·७८ | १६·८२ |
| घसारा, राखीव निधींत जमा | ४५·०० | ४५·०० | ४५·०० |
| अन्य रेल्वेस द्यावयाची रक्कम | ०·११ | ०·०७ | ०·०८ |
| एकूण खर्च | ३३०·८९ | ३५२·७७ | ३८८·८० |
| रेल्वेचें निव्वळ उत्पन्न | ५९·३२ | ६९·२६ | ७५·७० |
| सर्वसाधारण महसुलांत जमा | ५०·३९ | ५४·५१ | ५७·२७ |
| निव्वळ शिल्लक | ८·९३ | १४·७५ | १८·४३ |

* पे कमिशनच्या शिफारशीनुसार १ जुलै, १९५९ ते ३१ मार्च, १९६१ या मुदतींत होणाऱ्या सुमारें २० कोटी रु. वाढीव खर्चाचा या रकमेंत अंतर्भाव आहे.

## मध्यप्रदेशाच्या विकासासाठी पाहणी

मध्यप्रदेश सरकारनें राज्याचा आर्थिक विकास साधण्यासाठी नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संस्थेतर्फे पाहणी करून घेतली आहे. त्यावरून राज्याच्या विकासासाठी लागणाऱ्या साधनसंपत्तीची कल्पना येण्यासारखी आहे. राज्यांत उपलब्ध असणाऱ्या कच्च्या मालाचा व औद्योगिक सोयीसवलतींचा उपयोग करून १९६१–७१ पर्यंत अनेक मोठे उद्योगधंदे काढतां येतील असें पाहणीवरून दिसून आलें आहे. ही पाहणी केवळ आर्थिक स्वरूपाची नव्हती, तर तिला तांत्रिक बाजूचीहि जोड देण्यांत आली होती. वरील कालावधींत सुमारें ५३५ कोटी रुपये भांडवल मध्यप्रदेशांत गुंतवतां येण्यासारखें आहे, आणि त्यामुळें ५५,००० लोकांना रोजगाराची संधि मिळूं शकेल. भांडवलगुंतवणुकीपैकी २·५ कोटी रुपये तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मोठ्या व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांत गुंतविण्याचा विचार करण्यांत आला आहे. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांतून ९०·०८ कोटी रुपये गुंतविण्याची गरज आहे. सार्वजनिक मालकीच्या उद्योग-धंद्यांतून ४१४ कोटी रुपये गुंतविण्याची गरज आहे. त्यांपैकी सर्वांत मोठा भाग विजेची भारी यंत्रसामुग्री निर्माण करणाऱ्या कारखान्यासाठी लागेल. शेतीशीं संबंधित अशा उद्योगधंद्यांपैकी चार साखर कारखान्यांची शिफारस पाहणींत करण्यांत आली आहे. प्रत्येक कारखान्याची उत्पादनक्षमता १०,००० टन ठरविण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें सर्व राज्यांत निरनिराळ्या प्रकारचे १३ उद्योगधंदे स्थापन करण्याचें सुचविण्यांत आलें आहे. तथापि, नव्या उद्योगधंद्यांची उभारणी करतांना औद्योगिक शक्तीच्या मर्यादा लक्षांत घेतल्या पाहिजेत असा इषारा देण्यांत आला आहे.

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ३० लाख टन साखरेच्या खपाचें लक्ष्य

दि. १७ रोजीं साखर धंद्यासंबंधींच्या विकास मंडळाची १० वी बैठक झाली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ३० लाख टन साखरेच्या खपाचें लक्ष्य ठरविण्याची शिफारस या बैठकींत करण्यांत आली. हें लक्ष्य ठेविल्यास १९६५-६६ मध्यें दरडोई खपासाठी १३·८७ रत्तल साखर मिळूं शकेल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस हा आंकडा ११·७० रत्तल व्हावा.

साखरेच्या खपाचें सध्यांचें प्रमाण आधारभूत धरून ४८ कोटी लोकसंख्येला २५·०६ लाख टन साखर लागेल असें गृहित धरून सदर लक्ष्य ठरविण्याची शिफारस करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें अन्य संवयींतील बदलामुळें लागणारी २·१४ लाख टन जादा साखर व जनतेची क्रयशक्ति वाढल्यामुळें लागणारी २·५१ लाख टन जादा साखरहि यांत जमेस धरली आहे.

मागील हंगामाशीं तुलना करतां चालू हंगामांत ७ फेब्रुवारी १९६० पर्यंत साखरेचें उत्पादन सुमारें २·३ लाख टनांनीं वाढलें असल्याचें सदर मंडळाचे अध्यक्ष व मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याच्या शेतकी विभागाचे संयुक्त चिटणीस श्री. अमीर रेझा यांनीं या मंडळापुढें भाषण करतांना सांगितलें. या हंगामांत उसाखालील क्षेत्रफळ ५१ लक्ष एकर आहे. मागील वर्षीचा हाच आंकडा ४७ लक्ष एकर होता. यामुळें साखरपुरवठ्याच्या एकूण परिस्थितींत चांगलीच सुधारणा होण्याची अपेक्षा आहे असें सांगून, साखर-उत्पादनांत वाढ करण्यासाठी चालू हंगामांत योजण्यांत आलेल्या उपायांचीहि त्यांनीं माहिती दिली.

या वर्षीत आणखी २७ कारखान्यांत साखरेचें उत्पादन होण्यास सुरुवात झाली असून, चालू कारखान्यांपैकी २८ कारखान्यांचा विकास कार्यक्रम यंदा पूर्ण होऊन एकूण उत्पादनशक्ति ४·५३ लाख टन झाली आहे असें सांगून, १९६०-६१ मध्यें आणखी ११ कारखान्यांत उत्पादनास सुरुवात होईल अशी माहिती त्यांनीं दिली. साखर कारखान्यास लागणारी यंत्रसामुग्री देशांत तयार करण्याच्या कामांतहि बरीच प्रगति झाली असून, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील जादा उत्पादनासाठी परवाने द्यावयाच्या कारखान्यांस यंत्रसामुग्रीचा पुरवठा करण्यांत अडचण पडणार नाहीं असें त्यांनीं अखेरीस सांगितलें.

## तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठी सुखसोई

पांचशें मैलांहून अधिक प्रवास करणाऱ्या तिसऱ्या वर्गाच्या रेल्वे प्रवाशाकरितां कोणत्याहि प्रकारचा जादा आकार न घेतां, लांब अंतरापर्यंत जाणाऱ्या प्रत्येक गाडीला तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठी झोंपण्याची सोय असलेला एक डबा जोडण्याचें दीर्घ मुदतीचें उद्दिष्ट रेल्वे खात्यानें आपल्यासमोर ठेवलें आहे, अशी घोषणा रेल्वेमंत्री श्री. जगजीवनराम यांनीं लोकसभेंत रेल्वे खात्याचें अंदाजपत्रक सादर करतांना केली. मद्रास-हावडा मेल व दिल्ली-बॉम्बे सेंट्रल एक्सप्रेस या गाड्यांनीं प्रवास करणाऱ्या उतारूंसाठी अशी व्यवस्था यापूर्वींच करण्यांत आली असून, ब्रॉडगेज आणि मीटरगेजवरील गाड्यांसाठी प्रत्येकीं अशा दोनशें डब्यांसाठी मागण्या नोंदविण्यांत आल्या आहेत. हे डबे मिळाल्यानंतर आणखी अधिक गाड्यांवर ही सोय उपलब्ध करून देण्यांत येईल. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत दर महिन्याला सरासरी २७ नव्या गाड्या सुरू करण्यांत आल्या व १३ गाड्यांचा प्रवासाचा मार्ग अधिक लांब अंतराचा करण्यांत आला.

## शास्त्रीय विषयांच्या शिक्षणाला उत्तेजन

ऑस्ट्रेलिआंतील उद्योगपतींनीं शाळेंतील विद्यार्थ्यांना शास्त्रीय विषयांचें शिक्षण मिळणें अधिक सोपें जावें म्हणून सहकार्य देण्याचें ठरविलें आहे. आधुनिक शास्त्रें शिकण्याची अधिकाधिक संधि विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊन उच्च शास्त्रीय अभ्यासासाठी त्यांची मनोभूमिका तयार करावी असा उद्देश उद्योगपतींच्या सहकार्यामागें आहे. ह्यासाठी एक योजनाच आखण्यांत आली असून १९५५ सालीं ह्याच कार्यासाठी ब्रिटननें जी योजना तयार केली होती तिचा मार्गदर्शनासाठी उपयोग करण्यांत येणार आहे. योजना कार्यवाहींत आणण्यासाठी ऑस्ट्रेलिअन उद्योगपतींनीं १२ लाख ऑस्ट्रेलिअन पौंडांचा एक निधि उभारण्याचें ठरविलें आहे. शिक्षणक्षेत्रांतील ह्या योजनेचा अंतिम उद्देश मात्र निराळा आहे. ऑस्ट्रेलिआंतील शास्त्रीय व तांत्रिक प्रगति जोरानें होऊन उत्पादनांत वाढ व्हावी हाच तो उद्देश आहे. अर्थात् योजनेच्या अनुषंगानें सर्वच समाजांत शास्त्रीय विचारांना अधिक चालना मिळेलच. शाळांतून मूलभूत शास्त्रें शिकवण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. त्याचप्रमाणें ज्या शाळांतून शास्त्रीय विषय शिकविण्याच्या प्रयोगशाळा व साधनें नाहींत त्यांना तीं पुरविण्यांत येणार आहेत. फंडांतून विद्यापीठांतील शास्त्रीय शिक्षणालाहि मदत करण्यांत येणार आहे. शास्त्रीय शिक्षणाच्या ह्या योजनेंत दोन दोष मात्र आहेत. एक तर फंडांतून मिळणारी मदत खाजगी शाळांनाच देण्यांत येणार आहेत. ऑस्ट्रेलिआंत चार पैकी तीन मुलें सरकारी शाळेंत शिकणारीं आहेत. दुसरा दोष म्हणजे ही मदत फक्त मुलांच्या शाळांनाच मिळणार आहे. स्त्री-शिक्षणाच्या कैवाऱ्यांना ही गोष्ट बोचत आहे.

## अमेरिकेंतील खाजगी भांडवलाचें सहकार्य

भारतामधील औद्योगिक विकासाचें काम झपाट्यानें करतां यावें म्हणून अमेरिकन सरकारच्या मदतीप्रमाणेंच अमेरिकेंतील खाजगी मालकीच्या भांडवलाच्या सहकार्याचीहि आवश्यकता आहे. खाजगी मालकीचें भांडवल हिंदमध्यें गुंतविलें जाण्यासाठी योग्य तें वातावरण आतां अस्तित्वांत आल्यासारखें दिसतें. अमेरिकेमधील एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें रुपयाच्या चलनांतील तीन कर्जें भारतामधील तीन कंपन्यांसाठी म्हणून जाहीर केली आहेत. तिन्ही कर्जांची मिळून रक्कम ४ कोटी, २६ लाख रुपये आहे. ह्या सर्व कंपन्या अमेरिकेंतील कंपन्यांच्या उपकंपन्या म्हणून नोंदविण्यात येणार आहेत. सर्वांत मोठें कर्ज इंडिआ सिंडिकेट ह्या कंपनीला देण्यांत येणार आहे. कर्जाची रक्कम २ कोटी, ७१ लाख रुपये आहे. अमेरिकेंतील फायरस्टोन अँड रबर कंपनी ह्या कंपनीच्या सहकार्यानें मेसर्स किलाचंद देवचंद कंपनी भारतांत कृत्रिम रबर तयार करण्याचा एक कारखाना उत्तर प्रदेशांत बरेलीजवळ काढणार आहे. कर्जाची मुदत ९ वर्षांची आहे. दुसरें कर्ज १ कोटी रुपयांचें असून तें हिंदुस्थान अल्युमिनम कॉर्पोरेशन लि. ह्या कंपनीला देण्यांत येणार आहे. ह्याच कंपनीला पूर्वीं एकदां मोठें कर्ज देण्यांत आलेलें आहे. आतां देण्यांत आलेल्या कर्जापैकी कांहीं रक्कम उत्तर प्रदेशांतील रिहंड धरणाजवळ बांधण्यांत येणाऱ्या अल्युमिनमच्या कारखान्यासाठीहि वापरण्यांत येईल. तिसरें कर्ज ५५ लाख रुपयांचें असून तें म्हैसूर सिमेंटस लि. ह्या कंपनीला दिलेलें आहे. म्हैसूर राज्यांत सिमेंट तयार करण्याचा एक कारखाना काढण्यासाठी वरील कर्जाचा उपयोग करण्यांत यावयाचा आहे.

## बँक-नोकरांचा महागाई भत्ता

### प्रत्येक तिमाहीला इंडेक्स नंबरांतील पांच पॉइंट्सच्या फरकाप्रमाणें बदलणार

बँक अवार्ड कमिशननें शिफारस केलेल्या महागाई भत्त्याच्या कोष्टकांत भारत सरकारनें एक खास गॅझेट काढून दुरुस्ती केली आहे. ह्या दुरुस्तीप्रमाणें, बँक-नोकरांच्या महागाई भत्त्यांत दर तिमाहीला वाढ किंवा घट होईल. बँक अवार्ड कमिशनच्या शिफारसीप्रमाणें सहामाही बदलाची तरतूद होती. १९४४=१०० प्रमाणें १४४ ह्या इंडेक्स नंबरांत ५ पॉइंटसनें वाढ किंवा घट झाली, कीं त्याप्रमाणें महागाई भत्ता बदलेल; पूर्वी १० पॉइंटसची वाढ किंवा घट होईपर्यंत वाट पाहावी लागे. ३१ मार्च, १९५९ नंतरच्या सर्व तिमाहींना ही दुरुस्ती लागू होईल.

### ग्रामीण भागांतील सहकारी पतपेढ्या

'ग्रामीण विभागांतील सहकारी पतपेढ्या, सध्यां तरी, रिझर्व्ह बँकेनें मंजूर केलेल्या मर्यादेपर्यंत कर्जविषयक सोयींचा लाभ करून घेत नाहींत,' असें लोकसभेंत मध्यवर्ती अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीं प्रश्नोत्तरांच्या वेळीं सांगितलें. अशा सहकारी संस्थांनीं दिलेल्या कर्जांच्या एकूण रकमेचें प्रमाण फार प्रमाणांत वाढत नसल्याकारणानें केंद्र बँकांना त्यांना परवानगी आहे तेवढी रक्कम रिझर्व्ह बँकेकडून उसनी घेण्याची वेळच आलेली नाहीं. कर्जाऊ रकमा कमी प्रमाणांत घेतल्या जाण्यास योग्य असें कारण देतां न येणें, अर्जांचा निकाल लागण्याला विलंब लागणें आणि मध्यवर्ती बँकेकडून आणखी रकमा उसन्या घेण्याइतकी कांहीं प्राथमिक बँकांची आर्थिक स्थिति नसणें, इत्यादि कांहीं कारणें आहेत.

### हातिआ येथें वसविण्यांत येणारें नगर

बिहारमध्यें हातिआ ह्या ठिकाणीं भारी यंत्रसामुग्रीचा एक मोठा कारखाना व ओतकामाची भट्टी रशिआच्या मदतीनें उभारण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याची उभारणी करण्याचें प्रत्यक्ष काम हेवी एंजिनिअरिंग कॉर्पोरेशनकडे सोंपविण्यांत आलें आहे. कारखान्याच्या निमित्तानें होणाऱ्या वसतीसाठी एक स्वतंत्र नगरच वसविण्यांत येणार आहे. नगराची आंखणी करण्याचें काम आतां पूर्ण झालें आहे. बिहार सरकारनें कारखान्यासाठी लागणारी ४,००० एकर जमीन विनामूल्य देण्याचें ठरविलें असून ती ताब्यांत घेण्याची कायदेशीर व्यवस्था चालू होत आहे. यंत्रसामुग्रीचा कारखाना व ओतकामाची भट्टी, हीं दोन्हीं पूर्णपणें सुरू झालीं म्हणजे सुमारें २०,००० कामगारांना रोजगार मिळेल. ह्या कामगारांच्या कुटुंबियांची संख्या जमेस धरली म्हणजे नव्या नगरांत सुमारें १ लाख लोकांची सोय करावी लागणार आहे. नगराची बांधणी व विकास दोन टप्प्यानें करण्याचा कॉर्पोरेशनचा संकल्प आहे. असें केल्यानें नगरांत सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयींची व्यवस्था करतां येईल आणि ते सर्व बाबतींत स्वयंपूर्ण होईल. नगरबांधणीच्या पहिल्या टप्प्याला १३.५ कोटी रुपये लागतील, व दुसऱ्या व अखेरच्या टप्प्याला ७.५ कोटी रुपये लागतील. वरील दोन्ही कारखाने आणि त्याच्या अनुषंगानें स्थापन होणारें नगर ह्यांना पाणीपुरवठा मुबलक प्रमाणांत करण्यासाठी सुवर्णरेखा नदीवर धरण बांधण्यांत येत आहे. ह्या धरणाचें काम आतां पूर्ण होत आलें असल्यानें नगर-उभारणीचें काम हातीं घेण्यास अडचण राहिलेली नाहीं.

### लक्षापतीचा कक्षापती

गनिखान अश्रफखान नांवाच्या अहमदाबाद येथील भिकाऱ्याला बॉंबे बेगर्स ॲक्टखालीं अटक करण्यांत आली, तेव्हां त्याचा पूर्वेतिहास समजला. अश्रफखानचें घराणें रजपूत; त्याचे पूर्वज राज्यकर्ते होते. ते बाटून मुसलमान झाले आणि त्यांना सिरोही संस्थानांत जहागीर मिळाली. गनिखान हा मोठा जमिनदार होता; त्याची स्थावर मालमत्ताहि मोठी होती. कोर्टांतील तंट्यांत तो तें सर्व गमावला आणि १९३१ मध्यें अहमदाबादला आला. हदका गिरणींत त्याला काम मिळालें, पण गिरणीला तोटा येऊन ती बंद पडली आणि गनिखान बेकार झाला; अहमदाबादच्या फुटपाथवर भिक्षा मागून तो पोट भरूं लागला.

### पुणें पोस्टल को. बँकेंत सन्मान-समारंभ

पुणें पोस्टल को-ऑ. बँकेनें ता. २६ जानेवारी १९६० इसवी रोजीं प्रजासत्ताक दिन साजरा करून बँकेचे एक संस्थापक व १४-१५ वर्षे सन्मान्य चिटणीस म्हणून काम करणारे श्री. सीताराम गोविंद करमरकर यांचा सन्मान केला. त्यांनीं सन १९२१ सालीं संस्था स्थापन झाल्यापासून १९४० सालपर्यंत ह्या नाहीं त्या नात्यानें संस्थेची सेवा केली आहे. त्या वेळीं फक्त २ कारकून व १ शिपाई होता, आतां १० कारकून व दोन शिपाई आहेत. संस्थेचें कामहि कितीतरी पटीनें वाढलेलें आहे हें पाहून त्यांनीं आनंद व समाधान व्यक्त केलें.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनचा धंदा**—आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं मध्य विभाग अधिकाऱ्यांशीं नुकतींच बोलणीं केलीं. १९५९ सालीं ह्या विभागाचें उद्दिष्ट ५५ कोटी रुपये ठरविण्यांत आलें होतें. चालू वर्षी ह्या विभागांतून ७० कोटी रुपयांचा धंदा मिळविण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें आहे.

**पायाचा दगड बसविण्यास नकार**—काँग्रेसचे नवे अध्यक्ष श्री. संजीव रेड्डी ह्यांनीं नाशिक येथील काँग्रेस-भवनाच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविला. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, आंध्रचा मुख्य मंत्री असतांना हें काम करण्याचें त्यांनीं बंद केलें होतें. कारण, पुष्कळ वेळां पायाचा दगड बसविलेल्या इमारती पूर्णच होत नाहींत असा अनुभव त्यांना आला.

**ब्रह्मदेशांतील हिंदी नागरिक**—अ. ब्रह्मदेश तामीळ असोसिएशनचे अध्यक्ष मि. डेव्हिड ह्यांनीं अशी तक्रार केली आहे कीं, ब्रह्मदेशांतील हिंदी नागरिकांना परदेशीय नागरिक म्हणून नोंद करण्याच्या वेळीं फार त्रास देण्यांत येतो. नोंदीसाठीं त्यांच्याकडून जबर फी घेण्यांत येते, फेरनोंदणीसाठींहि अशीच फी आकारली जाते. फी न देतां आल्यास त्यांना पकडून तुरुंगांत घालण्यांत येतें.

**भारतीय शास्त्रज्ञांना आमंत्रण**—इस्राएलमध्यें येत्या ऑगस्ट महिन्यांत शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञ ह्यांची एक जागतिक परिषद भरविण्यांत येणार आहे. भारतामधील ह्या क्षेत्रांतील तज्ज्ञांना परिषदेला बोलावण्यांत आलें आहे. अविकसित देशांच्या विकासासाठीं शास्त्रीय ज्ञान काय करूं शकेल ह्याविषयीं परिषदेंत विचारविनिमय होणार आहे.

## सहकारी शेती हाच परिणामकारक उपाय

### सहकारी शेतीविषयक कार्यकारी गटाची शिफारस

### (१)

भारतांतील आर्थिक व सामाजिक स्थिति सुधारण्यासाठी विशेषत: बेताची शेती असणाऱ्या लहान लहान शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठी संयुक्त सहकारी शेती हाच परिणामकारक उपाय आहे असें ठाम मत सहकारी शेतीसंबंधींच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी श्री. निजलिंगप्पा यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी गटानें आपल्या अहवालांत व्यक्त केलें आहे. भारतांत सहकारी शेती यशस्वी होईल असा अभिप्राय या अहवालांत पुढें देण्यांत आला आहे.

कार्यकारी गटाच्या अहवालाचा हा पहिला खंड आज प्रसिद्ध झाला असून तो १४७ पृष्ठांचा आहे. त्यामध्यें सहकारी शेती-संस्था तयार करण्यासंबंधांत त्यांचें स्वरूप कसें असावें, त्यांची व्यवस्था, तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि संशोधन इ. गोष्टींचा ऊहापोह त्यामध्यें केलेला आहे. दुसरा खंड लवकरच प्रसिद्ध होईल.

गेल्या जून महिन्यांत भारत सरकारनें या गटाची नेमणूक केली होती. गटाच्या सदस्यांनीं आठ राज्यांत दौरे काढून अनेक सहकारी शेती संस्थांच्या कामकाजाची पाहणी केली व निरनिराळ्या अधिकाऱ्यांचीं व व्यक्तींचीं मतें ऐकून घेतलीं. मंत्र्यांबरोबर, खासदारांबरोबर तसेंच शेतकी क्षेत्रांतील तज्ज्ञांबरोबरहि सदस्यांनीं विचारविनिमय केला.

#### सक्ति नको

सहकारी शेतीसंस्था ही शेतकऱ्यांची, अधिक चांगल्या प्रकारें शेती करण्यासाठीं बनलेली स्वयंस्फूर्त संघटना असावी. त्यामधील बहुसंख्य सभासद शेतीच्या कामांत भाग घेणारे असावेत असें गटाचें मत आहे. गटाच्या मतें कोणत्याहि प्रकारें सक्ति करण्यांत येऊं नये. कांहीं राज्यांत अल्पसंख्य शेतकऱ्यांना संयुक्त सहकारी शेती संस्थेंत सक्तीनें सामील करून घेण्याबद्दलचे असलेले चालू कायदे या आपखुषीच्या तत्त्वांच्या विरुद्ध असून व्यवहार्य दृष्ट्याहि अनिष्ट आहेत. असे कायदे आतांपर्यंत लागू करण्यांत आले असले तरी ते रद्द करण्यांत यावेत असा सल्ला गटानें दिला आहे.

#### सुसूत्रतेचा अभाव

सुसूत्रतेच्या अभावीं देशामध्यें सहकारी शेतीचा विकास कांहींसा तुरळक प्रमाणांत व कसातरी झालेला आहे आणि म्हणून पद्धतशीर सहकारी शेतीचे फायदे दाखवितां येणें शक्य झालेलें नाहीं. सहकारी शेतीची वाढ होण्याविरुद्ध येणाऱ्या अडचणी मुख्यत्वें या विषयाचें योग्य तें ज्ञान नसल्यामुळें निर्माण झालेल्या आहेत असें मत गटानें व्यक्त केलेलें आहे. सर्वसामान्य शेतकऱ्याला सहकारी शेतीमुळें त्याचें उत्पन्न कमी होईल, कर्जे देणाऱ्या संस्था अशा संस्थांना कर्जे देण्यास कांकू करतात अशासारखी भीति वाटत असते.

#### प्रायोगिक योजना

येत्या चार वर्षांत प्रत्येक जिल्ह्यांत एक याप्रमाणें ३२० प्रायोगिक योजना सुरू करण्यांत याव्या अशी सूचना गटानें केली आहे. सुरुवातीला चालू वर्षांत ४१ योजना सुरू कराव्यात. अशा प्रत्येक योजनेंत १० सहकारी शेतीसंस्था संघटित करण्यांत याव्यात. म्हणजे १९६३-६४ अखेर या ३,२०० संस्थांत दिसून येणाऱ्या यशामुळें आणखी सुमारें २०,००० संस्था तयार होतील अशी अपेक्षा आहे.

नैराश्य आणि मागाहून होणारा गोंधळ टाळण्यासाठी अतिशय मोठ्या आशा निर्माण करून संस्था स्थापन करण्यांत येऊं नये, अशी धोक्याची सूचनाहि या अहवालांत देण्यांत आली आहे. एखादी सोसायटी यशस्वीपणें व सुरळीतपणें चालण्याच्या दृष्टीनें या अहवालांत पुढील गोष्टींस अतिशय महत्त्व देण्यांत आलें आहे. — (१) संस्थेच्या सभासदांच्या अंगीं नेतृत्वाचे गुण असणें (२) एकजिनसी हितसंबंध असलेल्यांस विस्तृत प्रमाणांत सभासदत्व देणें (३) संस्थेचा आकार ठरवितांना तिचें स्थैर्य आणि परस्परांची ओळख यांचा प्रामुख्यानें विचार आणि (४) मालकीची जमीन किती आहे हें विचारांत न घेतां सदस्यांना कारभारांत समान हक्क असण्याची तरतूद.

#### मालकी हक्क

सामान्यत: पांच वर्षेपर्यंत जमीन एकत्र करण्यांत यावी. आपली जमीन देणाऱ्या जमिनीच्या मालकांच्या मालकी हक्काला योग्य तो मान देण्यांत यावा; इतकेंच नव्हे तर त्यांना त्याचा फायदाहि मिळाला पाहिजे. जमीन दिलेल्या सभासदाला संस्थेमधून बाहेर पडतांना त्यानें तीच नाहीं तरी त्यानें दिलेल्या जमिनीच्या दर्जाची जमीन मिळावी.

संस्थेचा कारभार आणि कामकाज यांची जबाबदारी संस्थेच्या निवडलेल्या सदस्यांच्या समितीकडे सोपविण्यांत यावी. सभासदांची किंवा अध्यक्षांची नेमणूक करण्याची सध्यां कांहीं राज्यांत असलेली पद्धति रद्द करण्यांत यावी असें या अहवालांत म्हटलें आहे. संस्थेसाठीं एक स्वतंत्र मूल्यमापन समिति स्थापन करण्यांत यावी असें या कार्यकारी गटानें सुचविलें आहे. नोंदणीची आणि इतर प्रकारच्या दप्तरी कामाची माहिती असलेला चिटणीस सभासदांमधूनच निवडणें जरूर आहे असें या गटाचें मत आहे.

#### 'गैरहजर' हजर सदस्य असूं नयेत

सहकारी शेतासाठीं लागणारें मनुष्यबळ त्या त्या विभागांतील कामकरी सदस्यांच्या संख्येनुसार संघटित करण्यांत यावें. सोयीचे पडण्याच्या दृष्टीनें व गटागटांत उत्तम स्पर्धा लावावी म्हणून सदस्यांचे हंगामी पायावर गट तयार करण्यांत यावे. शक्य तर नुसते जमीन असणारे व काम न करणारे लोक सदस्य म्हणून नोंदवून घेऊं नयेत आणि आपल्या बदली मनुष्य देण्याच्या पद्धतीस उत्तेजन देण्यांत येऊं नये.

सहकारी शेतीच्या योजनेंत ग्रामोद्योगांना व कुटीरोद्योगांना महत्त्वाचें स्थान असावें.

#### सहकारी संस्थेचें यश

सहकारी शेती संस्थेचें यश त्या संस्थेच्या सदस्यांना होणाऱ्या एकूण उत्पन्नावरून ठरवावें, रोजंदारीवरून नव्हे असें अहवालांत म्हटलें आहे. राखीव निधि, विकास इ. बाबींवर खर्च झाल्यानंतर उरणारा नफा सदस्यांना केलेल्या कामाबद्दल बोनस म्हणून देण्यांत यावा व तो संस्थेंत जमा केलेल्या जमिनीच्या प्रमाणांत बावा असें अहवालांत म्हटलेलें आहे.

#### यंत्रसामग्रीचा वापर

शेतकीसाठी यंत्रशक्तीचा वापर करण्यासंबंधांत या गटानें शेतकऱ्यास बेकार करणारें यांत्रिकीकरण आणि कार्यक्षमतेंत व रोजगारांत वाढ करणारें यांत्रिकीकरण असा भेद केला आहे. दुसऱ्या प्रकारच्या यांत्रिकीकरणांत, पाणी काढण्यासाठी पंप व इंजिनांचा वापर केला जाण्याची शक्यता आहे.

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

अहवालाचे वर्षीं सर्व खर्च भागवून, नोकरवर्गाचे ग्रॅच्युइटी निधीस रुपये १,००,००० वर्ग केल्यावर, नोकरवर्गास बोनस देण्यासाठीं रुपये १,०५,००० ची तरतूद केल्यावर आणि इतर नित्याच्या व आवश्यक त्या तरतुदी केल्यावर

| | | |
|---|---|---|
| बँकेस तिच्या व्यवहारांत नक्त नफा इतका झाला असल्याचें दिसून येईल. | | रु. ७,७२,०२७–९७ |
| चालू वर्षीचे या नफ्याचे रकमेंतून गंगाजळी | रु. १,६०,००० | |
| १९५९ सालचे करांसाठी तरतूद | रु. ३,४०,००० | रु. ५,००,०००–०० |
| याप्रमाणें रकमा वर्ग केल्यावर इतकी रक्कम शिल्लक राहते. | | रु. २,७२,०२७–९७ |
| या रकमेंत गेल्या वर्षांतून पुढें ओढलेली नफ्याची बाकी | | रु. ३९,३३९–२२ |
| मिळविल्यावर एकूण इतकी रक्कम वांटण्याकरितां उपलब्ध राहते. | | रु. ३,११,३६७–१९ |

या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें व्हावी अशी संचालकांची शिफारस आहे :

| | |
|---|---|
| दिनांक ३१ डिसेंबर, १९५९ ला पूर्ण झालेल्या वर्षासाठीं ६४,००० भागांवर वसूल रकमेवर द. सा. द. शें. ९ टक्के प्रमाणें प्रमाणतः करपात्र डिव्हिडंड देण्यासाठीं | रु. २,६८,७६५–१२ |
| ही रक्कम पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढली जाईल. | रु. ४२,६०२–०७ |
| | रु. ३,११,३६७–१९ |

अहवालाचे वर्षी बँकेच्या खामगांव, यवतमाळ, बॉंबे सेन्ट्रल व वरळी ( मुंबई ), युनिव्हर्सिटी ( पुणें ), बार्शी व अकलूज अशा एकूण सात ठिकाणीं नवीन शाखा सुरू करणेंत आल्या. बँकेच्या एकूण शाखा आतां ५१ झाल्या आहेत. कांहीं थोडे जिल्हे वगळतां, महाराष्ट्रांतील प्रत्येक जिल्ह्यांत आतां महाराष्ट्र बँकेची शाखा आहे.

### किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि.

जून १९५९ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीला विक्रीपासून २·२ कोटी रु. मिळाले; त्यापूर्वीच्या वर्षी १·९७ कोटी रु. मिळाले होते. कंपनीनें अल्टरनेटर्स बनविण्यास प्रारंभ केला आहे. फ्रॅक्शनल एच. पी. मोटर्स, डी. सी. मोटर्स व जनरेटर्स बनविण्यास सरकारनें कंपनीला परवाना दिला आहे. ५·३६ लक्ष रु. घसारा, २·४६ लक्ष रु. डेव्हलपमेंट रिबेट, १·५ लक्ष रु. सुधारणा व आधुनिकीकरण, ९·६२ लक्ष रु. कर, अशी तरतूद करून कंपनीस ५·८२ लक्ष रु. नफा झाला आहे. १०% करपात्र डिव्हिडंडला ३·८७ लक्ष रु. लागतील.

### लंडनमधील अनौरस संतति

गेल्या चार वर्षांत लंडनमधील अनौरस जननांचें प्रमाण बरेंच वाढलें आहे. १९५८ च्या लंडन कौंटी कौन्सिलच्या अहवालाप्रमाणें, १९५८ मध्यें एकूण जननाच्या ९·९% संतति अनौरस होती.

### मनोवैज्ञानिक क्रांति — औद्योगिक संबंध

**श्री. वा. काळे ह्यांचें भाषण**

आकाशवाणीच्या पुणें केंद्रावरून, " मनोवैज्ञानिक क्रांति " ह्या भाषणमालेंत, ' औद्योगिक संबंध ' ह्या विषयावर श्री. श्री. वा. काळे ह्यांचें शनिवार, दि. २७ रोजीं रात्रीं ८–१५ वाजतां भाषण होणार आहे.

### सहकारी तत्त्वांचा तरुण पिढींत प्रसार

जयपूर येथील सहकारी कार्यकर्त्यांच्या अधिवेशनांत श्री. वैकुंठभाई मेहता, मुंबई स्टेट को. युनियनचे चेअरमन, ह्यांनीं आपल्या भाषणांत सुचविलें, कीं शाळा-कॉलेजांच्या अभ्यासक्रमांत सहकार हा विषय घालण्यांत यावा, त्याचप्रमाणें शिक्षकांच्या ट्रेनिंग संस्थांतूनहि तो विषय अभ्यासिला जावा. नव्या पिढीला सहकाराच्या मूलतत्वांची माहिती असणें आवश्यक आहे. त्यांना सहकारी वृत्तीचे बनविण्यासाठीं विशेष प्रयत्न करण्यांत यावा. सहकारी चळवळीच्या क्षेत्रांत असलेल्या सर्वांना आपले अधिकार आणि जबाबदाऱ्या ह्यांची जाणीव करून दिली जाणें जरूरीचें आहे. सोसायट्यांच्या सर्व सभासदांमध्यें ही जाणीव असली, म्हणजे सहकारी संघटनेचा पाया भक्कम तयार होईल आणि सरकारी साहाय्य व पाठिंबा ह्यांवर सहकारी चळवळीला जरूरीपेक्षां जास्त अवलंबून रहावें लागणार नाहीं.

**मोटारसायकलींचा कारखाना**—भारत सरकारच्या परवाना कमिटीनें खाजगी मालकीच्या एका कंपनीला मोटारसायकली तयार करण्याचा कारखाना काढण्याची परवानगी दिली आहे. ह्या परवान्याप्रमाणें काढण्यांत येणारा मोटारसायकलींचा कारखाना म्हैसूर येथें काढण्यांत यावयाचा आहे.


## भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,०८,००० |
| खपलेलें भांडवल ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठीं लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे | न. भू. ना. पां. थोपटे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| रावसाहेब य. द. खोले | श्री. चं. रा. राठी |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंदुके |

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

## दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री· दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ· ना· भि· परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री· फ्रामजी पी· पोचा
४. श्री· गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार पेठ, पुणें

गो· गं· साठे
मॅनेजर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

३० जून, १९५९ अखेर

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.